*अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींग*

# पुणे विद्यापीठ

## निवडणूक सूचना

(एक) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २५ (२)(एम) मधील तरतूदीनुसार **आठ** (त्यापैकी **दोन जागा महिलांसाठी** आणि **एक जागा इतर मागासप्रवर्ग (OBC)** या प्रवर्गासाठी राखीव) **संस्था प्रतिनिधींना विद्यापीठाच्या अधिसभेवर (सिनेट)**

**आणि**

(दोन) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, कलम २९(२)(एन) मधील तरतुदीनुसार **दोन संस्था प्रतिनिधींना विद्यापीठाच्या विद्यापरिषदेवर (ॲकेडेमिक कौन्सिल)**

**परिनियम ३६६ नुसार ही निवडणूक सूचना देण्यात येत आहे.**

(१) बुधवार दिनांक १४ जुलै, २०१० रोजी प्रसिध्द केलेल्या तात्पुरत्या मतदार यादीस परिनियम क्र. ३६४ अन्वये प्राप्त दुरुस्त्या विचारात घेऊन मा. कुलगुरु यांनी मान्य केलेल्या व दि. ३१ जुलै, २०१० रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादीप्रमाणे या निवडणूका घेण्यात येत आहेत.

(२) अंतिम मतदार यादीत नावे समाविष्ट असलेल्या संस्था प्रतिनिधींनाच या निवडणुकीत भाग घेता येईल.

**सदर निवडणूक कार्यक्रम खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | तपशील | तारीख, वार व वेळ | स्थळ |
|---|---|---|---|
| १ | उमेदवारी अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख, वार व वेळ (परिनियम ३६६,३६७) | शुक्रवार, दि.२० ऑगस्ट, २०१० सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |
| २ | उमेदवारी अर्जाची छाननीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७१) | शुक्रवार, दि. २० ऑगस्ट, २०१० सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | क्लासरुम कॉम्प्लेक्स इमारत, आरोग्य केंद्राच्या समोर, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |
| ३ | उमेदवारी अर्ज माघार घेण्याची तारीख, वार व वेळ (परिनियम ३७०) | सोमवार, दि.२३ ऑगस्ट, २०१० सायंकाळी ६.००वाजेपर्यंत | निवडणूक विभाग, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी केंद्र इमारत, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |
| ४ | निवडणूकीची तारीख, वार व वेळ (परिनियम ३६६) | मंगळवार, दि.३१ ऑगस्ट, २०१० सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत | **१) पुणे जिल्हा :** क्लासरुम कॉम्प्लेक्स इमारत, आरोग्य केंद्राच्या समोर, पुणे विद्यापीठ, पुणे - ७ **२) अहमदनगर जिल्हा :** पेमराज सारडा महाविद्यालय, अहमदनगर. **३) नाशिक जिल्हा :** एच.पी.टी.महाविद्यालय, नाशिक. |
| ५ | मतमोजणी | गुरुवार, दि. २ सप्टेंबर, २०१० सकाळी ११.०० वाजता | क्लासरुम कॉम्प्लेक्स इमारत, आरोग्य केंद्राच्या समोर, पुणे विद्यापीठ, पुणे-७ |

उमेदवारी अर्ज व उमेदवारी मागे घेण्याचे अर्ज विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून सदर अर्ज डाऊनलोड करुन घ्यावा आणि उमेदवारी अर्ज पूर्ण भरुन प्रत्यक्ष सादर करताना अर्जाची किंमत रु. १००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) व उमेदवारी मागे घेण्याचा अर्ज पूर्ण भरुन प्रत्यक्ष सादर करताना अर्जाची किंमत रु. १०/-(अक्षरी रुपये दहा फक्त) रोख स्वरुपात निवडणूक विभाग, पुणे विद्यापीठ येथे जमा करावी.

(३) मतदार यादीत समाविष्ट असलेले संबंधित मतदारसंघातील कोणतेही दोन मतदार, मतदार यादीत समाविष्ट असलेल्या उमेदवारास सूचित किंवा अनुमोदित करू शकतात. (परिनियम ३६९)

(४) मतदार यादीत तीन किंवा तीनपेक्षा कमी मतदार असल्यास उमेदवार स्वतःचे नाव स्वतःच सूचित आणि/किंवा अनुमोदित करू शकतो. अन्यथा उमेदवार स्वतःचे नाव स्वतःच सूचित किंवा अनुमोदित करू शकणार नाही. (परिनियम ३६९)

(५) योग्य रितीने भरलेले आणि विहित वेळेपूर्वी दाखल केलेले उमेदवारी अर्जच विचारात घेतले जातील. (परिनियम ३६७ व ३६९ )

(६) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा अधिक उमेदवार नसतील तर हे उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे जाहीर करण्यात येईल. (परिनियम ३७२)

(७) उमेदवारी मागे घेण्याच्या मुदतीनंतर निवडून द्यावयाच्या जागांपेक्षा जास्त उमेदवार असतील, तर अशा उमेदवारांची अंतिम यादी जाहीर करण्यात येईल. सदर निवडणूक मंगळवार, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१० रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत निवडणूक कार्यक्रमात वर्णन केलेल्या मतदान केंद्रावर घेण्यात येईल.

(८) मतदाराने मतदानाच्या वेळी स्वतःचा फोटो असलेले ओळखपत्र उदा. वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हींग लायसेन्स) किंवा ते ज्या संस्थेत सेवेत आहेत तेथील नियुक्त्यांचे ओळखपत्र किंवा सर्वसाधारण (जनरल) निवडणूकीसाठी सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले ओळखपत्र, इन्कम टॅक्स कार्यालयाने दिलेले पॅनकार्ड किंवा तत्सम ओळखपत्र दाखविल्याशिवाय त्यांना मतपत्रिका मिळणार नाही.

(९) अर्ज छाननी आणि मतमोजणीच्या वेळी स्वतः उमेदवार किंवा त्याने लेखी पत्राव्दारे प्राधिकृत केलेला त्याच मतदार यादीतील त्यांचा एक प्रतिनिधी वेळेपूर्वी किमान अर्धा तास पूर्वसूचना देऊन हजर राहू शकतो.

(१०) महाराष्ट्र शासन राजपत्र दिनांक १४ सप्टेंबर, २००९ अन्वये विद्यापीठाच्या कोणत्याही अधिकार मंडळावर निवडून येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी शासनाने विहित केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचेच नामनिर्देशन अर्ज ग्राह्य धरण्यात येतील. राजपत्राची प्रत विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statute या लिंकवर उपलब्ध आहे.

(११) महाराष्ट्र शासनाने दिनांक १४ सप्टेंबर, २००९ रोजीच्या राजपत्रान्वये विहित केलेल्या पात्रता शर्ती आणि या पात्रता शर्तींच्या ग्राह्यतेसंबंधिचे नियम परिपत्रक क्र. ११३/२०१०,दि. २ ऑगस्ट, २०१० विद्यापीठाच्या election.unipune.ac.in या संकेतस्थळावर Act/Statute या लिंकवर उपलब्ध आहेत.

**(१२) उमेदवार अनुक्रमांक १० व ११ मध्ये नमूद केलेल्या पात्रता शर्ती पूर्ण करणारा असणे आवश्यक आहे.**

मा. कुलगुरु यांच्या आदेशावरुन

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ क्र. पुविनि/२५(२)(एम)/२९(२)(एन)/ )
दिनांक : ३ ऑगस्ट, २०१० )

( डॉ. मा. ल. जाधव )
**कुलसचिव**

**प्रत :** सर्व संबंधित मतदार.

Desktop\election 2010\Notification of Mrc